सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४

# वृक्षसंवर्धनासाठी चळवळ हाती घ्यावी : सयाजी शिंदे

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : सध्या विकासाच्या नावाखाली हजारो झाडे कापली जात आहेत, एकही जंगल सुरक्षित राहिलेले नाही. पर्यावरणाच्या ऱ्हास हा प्रश्न गंभीर बनला आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लाखो विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची चळवळ हाती घ्यावी. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील नवीन विद्याशाखा एम. बी. ए. आणि एम. सी. ए.च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी आजच्या काळात रोजगाराच्या संधी कमी होत असताना रोजगार देणारे उद्योजक निर्माण करण्यासाठी एम. बी. ए. आणि एम. सी. ए हे अभ्यासक्रम सुरू करीत असल्याचे सांगितले. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सिनेकलावंत सुजित शेख यांनीही मनोगत व्यक्त केले.



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील कार्यक्रमात बोलताना अभिनेते सयाजी शिंदे. या वेळी श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे आदी उपस्थित होते.

प्राचार्य वीरेन भिर्डी, आर. के. पाटील, विराज जाधव, अमित आव्हाड, विजय पुजारी, अश्विनी चौगुले, सर्जेराव खोत यांचा सत्कार झाला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी करून दिली. प्रा. विराज जाधव यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. अशोक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी श्रीराम साळुंखे, प्र. प्राचार्य डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.

02/08/24

2/8/24

लोकमत

epaper.lokmat.com ६

कोल्हापूर, शुक्रवार, दि. २ ऑगस्ट २०२४

# नोकरी करत पीएसआयपदाला गवसणी

## मानकात्रेवाडीच्या मयूरी पाटीलचे यश : खासगी कंपनीत काम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पोस्ट कार्यालयात नोकरी करत उरलेल्या वेळात अभ्यास करून मानकात्रेवाडी (ता.पन्हाळा) येथील मयूरी तुकाराम पाटील यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेचा गुरुवारी निकाल जाहीर झाला. यात मयूरी यांनी यश मिळविले. खासगी कंपनीत काम करत करत अभ्यासाचे वेळापत्रक तयार करत मयूरीने हे यश मिळवले आहे. मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करत मन लावून अभ्यास केला. त्यात सातत्य ठेवले त्यामुळेच हे यश मिळवू शकल्याचे मयूरीने यावेळी सांगितले. गावातील संजयसिंह माध्यमिक विद्यालयात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. पन्हाळा येथील संजीवन नॉलेज सिटीतील छत्रपती शिवाजी महाराज ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावी बारावीपर्यंतचे तर कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजमध्ये गणित विषयातून पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले.

वडील तुकाराम पाटील हे शेती करतात तर आई संगीता पाटील प्राथमिक शिक्षिका आहेत. मला प्रा. जॉर्ज क्रुझ यांचे मार्गदर्शन लाभले असून आई-वडील, बहीण, भाऊ आणि नातेवाईकांचे प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

02/08/2024

2/8/2024

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४

# जिल्ह्यातील तरुणांनी बांधले यशाचे तोरण

## पोलिस उपनिरीक्षक परीक्षेचा निकाल जाहीर


मनाली शिंदे


मयूरी पाटील


श्रीनिवास खराडे


शुभम पाटील


दादासो माने

कोल्हापूर, ता. १ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या अराजपत्रित गट ब परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यामध्ये कसबा बावडा येथील अजिंक्य भगवान कांबळे, शुभम माने, मंगळवार पेठेतील मनाली शिंदे हिच्यासह अनेकांचे यश प्रेरणादायी आहे. ही परीक्षा ऑक्टोबर २०२२ ते जुलै २०२४ या कालावधीत घेतली होती.

पोलिस उपनिरीक्षक पदासाठीची पूर्वपरीक्षा ८ ऑक्टोबर २०२२ ला झाली होती. त्यानंतर मुख्य परीक्षा २८ ऑक्टोबर २०२३ मध्ये झाली. शारीरिक चाचणी झाल्यानंतर मुलाखती २ जुलै २०२४ मध्ये झाल्या. आज परीक्षेचा निकाल जाहीर झाला. तृतीयपंथीय आरक्षणावरून न्यायालयात याचिका दाखल झाल्यामुळे परीक्षेचा निकाल लागण्यास विलंब झाला. या परीक्षेत शिरोळ तालुक्यातील घालवाड येथील श्रीनिवास भिकाजी खराडे, पन्हाळा तालुक्यातील मानकात्रेवाडी येथील मयूरी तुकाराम पाटील, भुदरगड तालुक्यातील कोनवडे येथील सुदर्शन रघुनाथ पाटील, राधानगरी तालुक्यातील सुळंबी गावचे शुभम पिराजी पाटील, आणाजे गावचे अक्षय पाटील, सांगली जिल्ह्यातील शिराळ्याचे धनाजी शेळके, करवीर तालुक्यातील गणेशवाडी येथील दादासो माने यांनी यश मिळवले.

**विद्याप्रबोधनीचे यश**

विद्याप्रबोधनीच्या विवेक कारंडे, वसंत थोरात, धनाजी शेळके, सोनाली नूलकर या विद्यार्थ्यांनी पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत यश मिळवले.

“ विवेकानंद महाविद्यालयातून गणित विषयात बी.एस्सी. पदवी घेतली. त्यानंतर खासगी कंपनीत नोकरी करत होते. पण, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे धेय डोळ्यासमोर ठेवले होते. वेळेचे नियोजन करून अभ्यास केला. प्रश्नपत्रिका सोडवण्यावर भर दिला. प्रा. जॉर्ज क्रुझ यांचे मार्गदर्शन लाभले. आई, वडील यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे हे यश मिळवू शकले.

**- मयूरी पाटील**

“ स्पर्धा परीक्षेत यश मिळवून पोलिस खात्यात दाखल होण्याचे स्वप्न होते. त्यासाठी स्वयंअध्ययनावर भर दिला. वडील खासगी कंपनीत नोकरी करतात आणि आई गृहिणी आहे. वेळेचे नियोजन करून अभ्यास केल्याने सरावासाठी वेळ मिळाला. याचा लाभ परीक्षेत झाला.

**- श्रीनिवास खराडे**

“ इस्लामपूर येथून बी. टेक. केल्यानंतर स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. पहिल्यांदा तलाठी पद मिळाले. रायगड येथे तलाठी म्हणून कार्यरत होतो. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक पदासाठी प्रयत्न सुरू केले. अभ्यास करताना विषयांची मूळ पुस्तके वाचणे, त्यातील नोटस् काढणे असा अभ्यास केला. त्यामुळे यश मिळाले. या यशात मुंबई असिस्टंट कमिशनर स्टेट टॅक्स ज्ञानेश्वर पाटील व पुण्यातील ग्राउंड मार्गदर्शक सचिन शेगार यांचे मार्गदर्शन लाभले.

**- सुदर्शन पाटील**